# शहरात सर्वपक्षीय साखळी उपोषण

**पुणे :** मनोज जरांगे पाटील यांना पाठींबा देण्यासाठी भरत मिश्रमंडळाच्या वतीने मंगळवारी शहरात सर्वपक्षीय साखळी उपोषण करण्यात आले.

या वेळी बाळासाहेब दाभेकर, अंकुश काकडे, मंदार जोशी, राजेंद्र शिंदे, जितेंद्र निजामपूरकर, उमेश गालिदे, अनिल मेनपूरे, राजेंद्र पंडित, संजय मोरे, गणेश भरकुडे, विशाल धनवडे, अनिकेत घुले, विमल दाभेकर, शुभंगी पवार, शोभा कुडले, सुजाता नालगुडे, रेणुका शिंदे, सविता जाधव आदी उपस्थित होते.

औंध, बाणेर, बालेवाडी, पाषाण, सुतारवाडी, सोमेश्वरवाडी, बोपोडी, बावधन, बहिरटवाडी, गोखलेनगर, जनवाडी, मंडिल कॉलनी, भोसलेनगर, वाकडेवाडी, पाटील इस्टेट, वडारवाडी, पांडवनगर आदी परिसरातील मराठा समाजातर्फे ठिय्या आंदोलन करण्यात आले.


**जाहीर सूचना**

महाराष्ट्र सरकार, पर्यावरण विभाग, कोली क्रं. २५७, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांनी त्यांच्या पत्र क्रं. SEAC-III-2014/C.R.194/TC-3 दिनांक. १० डिसेंबर २०१५, द्वारे पहिली आणि पुणे महानगर पालिका मार्फत पत्र क्रं. आय ई सी / समिती/ -५ दिनांक. १३ ऑटोबर २०१७ रोजी दुसरी मे. वेलबील नर्सेज प्रायव्हेट लिमिटेड. पुणे ह्यांच्या रहिवासी प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक परवानगी दिली आहे.

सदर पर्यावरण विषयक परवानगीच्या वर्ती आस्थपना माहितीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे आणि पुणे महानगर पालिका यांच्याकडे उपलब्ध आहेत.

**मे. वेलबील्स नर्सेज प्रायव्हेट लिमिटेड. ''राजगुही रेसिडेन्सी''**
स.नं. ६३/१/१, ६३/१/२ आणि ६३/२,
कोंढवा, पुणे.



**U.P. State Road Transport Corporation**
Parivahan Bhavan, Tehri Kothi, 6 M.G. Marg, Lucknow-226001 (U.P.)

Tender No.: 2978 MT/2023-48 MT/2023-Diesel Dated : 27.10.2023

**E-TENDER NOTICE**

UPSRTC is inviting E-tenders from only eligible sources (Eligibility for participating in tender is given in the tender document) for following item :-

| Sl | Name of Items | Availability & e-submission of e-Tender on e-portal | Pre-Bid Meeting At Head Quarter Lucknow | Opening of e-Tender document |
|---|---|---|---|---|
| 1 | Installation and Maintenance of Diesel Dispensing Unit, Storage tank etc. and Supply of HSD OIL FOR UPSRTC, Regions/ Depots. as mentioned in bill of quantity | 01.11.2023 to 22.11.2023 At 15:00 PM | 08.11.2023 at 12:00 HRS. | 22.11.2023 at 16:00 PM |

All e-tenders of UPSRTC shall be available on the website of Govt. e-portal etender.up.nic.in. Detailed Bill of quantity, Eligibility for participating in tender, Other terms and conditions of the tender and calendar/timing of the tender may be seen on Govt. e-portal etender.up.nic.in.

Please do visit etender.up.nic.in from time to time before last date of submission of tender for any possible amendment/corrigendum/addendum. Any amendment/ corrigendum/addendum will only be published in e-portal etender.up.nic.in.

For any query/clarification regarding submission of e-tender vendors may call on following numbers : (1) 0522-2261307 (2) 0522-2268841 Additional Managing Director



**फटाका विक्रीसाठी स्टॉल्स भाडयाने देणेबाबत जाहीर निवेदन**

"पुणे पेठ लोहगाव स.नं. २०७ पैकी फिनिक्स मॉल शेजारी येथे पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर ०३ फटाका स्टॉल्ससाठी रिकामी जागा भाडयाने देणेचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे. सदरची प्रक्रिया ऑनलाईन लिलाव पद्धतीने पार पाडण्यात येणार असून त्यासाठीच्या उपलब्ध जागांची माहिती, अटी, शर्ती व इतर तपशील पुणे महानगरपालिकेच्या pmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी सदर संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार सदरचे लिलाव पद्धतीत भाग घेता येईल. तसेच या प्रक्रियेत काही बदल झाल्यास त्याबद्दल पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर माहिती देण्यात येईल."

जाहिरात क्र. ९/११५६, दि. ३१.१०.२०२३ वाचावे.



**इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: इंडियन ऑइल भवन, जी-९, अली यावर जंग मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४००५५१
फोन नं.: (022)26447327 ईमेल-आयडी: investors@indianoil.in वेबसाइट: www.iocl.com
सीआयएन-L23201MH1959GOI011388

**रेकॉर्ड तारखेची सूचना**

कंपनीच्या सचालक मंडळाने मंगळवार, ३१ ऑक्टोबर, 2023 रोजी झालेल्या बैठकीत, आर्थिक वर्ष 2023-24 साठी रु. 10 प्रत्येकीच्या इक्विटी शेअर्सवर प्रति शेअर साठी रु. 5.00 अंतरिम लाभांश जाहीर केला आहे.

कंपनीने अंतरिम लाभांश प्रदान करण्यासाठी भागधारकांची पात्रता निश्चित करण्याच्या उद्देशाने शुक्रवार, 10/11/2023 ही तारीख ''रेकॉर्ड तारीख'' म्हणून निश्चित केली आहे.

स्टॉक एक्सचेंजेसना सादर केलेली रेकॉर्ड तारखेची सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर http://www.iocl.com आणि स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर http://www.nseindia.com आणि http://www.bseindia.com येथे देखील पाहता येईल.

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड साठी
sd/-
(कमल कुमार ग्वालानी)
स्थळ: मुंबई कंपनी सचिव
दिनांक: 31 ऑक्टोबर, 2023



**पुणे महानगरपालिका**
**जाहीर प्रकटन**

**पुणे महानगरपालिकेच्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांच्या हयातीच्या दाखल्याबाबत.**

पुणे महापालिकेच्या सेवेमधून निवृत्त होणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तिवेतन), १९८२ मधील तरतूदीनुसार निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन अदा करण्यात येते. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र. ३३२ व ३३५ मध्ये निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनी वर्षातून एकदा हयातीचे दाखले / हयातीचे प्रमाणपत्र महापालिकेकडे सादर करणे अनिवार्य आहे व विहीत मुदतीत हयातीचे दाखले सादर न केल्यास त्यापुढील महिन्यांचे निवृत्तिवेतनाचे प्रदान हे हयातीचे दाखले सादर केल्यानंतरच केले गेले पाहिजे, असे स्पष्ट केले आहे. सबब महापालिकेच्या सर्व निवृत्तिवेतनधारकांनी तसेच कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनी त्यांचे हयातीचे दाखल्यास पुर्ननियुक्तीचे दाखले पुणे महापालिकेस सादर करणे आवश्यक आहे. सदरील कामकाजासाठी पुणे अर्बन सहकारी बँक, जनता सहकारी बँक, पुणे तसेच बँक ऑफ महाराष्ट्र यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

तरीपुणेमहापालिकेच्यासर्वनिवृत्तिवेतनधारक/कुटुंबनिवृत्तिवेतनधारक यांना आवाहन करण्यात येते की, सर्व निवृत्तिवेतनधारकांनी तसेच कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनी त्यांचे हयातीचे दाखल्यास पुर्ननियुक्तीचे दाखले **दि. १६/११/२०२३ ते दि. १५/१२/२०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत** स्वत:चे निवृत्तिवेतन जमा होणाऱ्या बँकेमार्फत अथवा निवृत्तिवेतन विभाग, मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका येथे समक्ष उपस्थित राहून सादर करावयाचे आहे. सदरील मुदतीत उपरोक्तप्रमाणे दाखले सादर न केल्यास त्यापुढील महिन्यांचे निवृत्तिवेतनाचे प्रदान हे हयातीचे दाखले सादर केल्यानंतरच करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी /-
**(उल्का कळसकर)**
सह महापालिका आयुक्त तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जाहीरात क्र. ९/११३९, दि. ३१.१०.२०२३ पुणे महानगरपालिका


# मराठा आरक्षण आंदोलन जिल्ह्यात तीव्र

**तिढा**
**मराठा आरक्षणाचा**

**टीम मटा,** पुणे

मराठा आरक्षणप्रश्नी सुरू असलेले आंदोलन पुणे जिल्ह्यासह उपनगरांत तीव्र रूप धारण करीत आहे. आंदोलनाला हिंसक वळण लागू नये, यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यामित्तिने अनेक ठिकाणच्या आगारांमधून बससेवा बंद करण्यात आली होती. अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे प्रवाशांचा खोळंबा झाला.

■ **नीरेत जलसमाधी आंदोलन**

**इंदापूर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सराटी येथे नीरा नदीच्या पात्रात मंगळवारी जलसमाधी आंदोलन करण्यात आले. बावडा-लाखेवाडी जिल्हा परिषद गटातील अनेक मराठा बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेऊन मराठा समाजास तत्काळ आरक्षण जाहीर करावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

धर्मेंद्र कोरे
नारायणगाव (ता. जुन्नर) एसटी आगारातील बस फेऱ्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची गैरसोय झाली.

■ **नऊ सदस्यांचे राजीनामे**

**इंदापूर :** मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून सुरवड (ता. इंदापूर) ग्रामपंचायतीच्या नऊ सदस्यांनी मंगळवारी सदस्यत्वाचे राजीनामे सरपंच योगिता शिंदे यांच्याकडे दिले. गीतांजली कोरटकर, प्रियांका म्हेपरकर, सोनाली कोरटकर, प्रियांका वाघ, रावसाहेब घोरपे, अण्णासाहेब घोरपे अशी राजीनामा दिलेल्यांची नावे आहेत.

■ **केवळ स्थानिक बस सुरू**

**सासवड :** सासवड राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगार व्यवस्थापनाने नाशिक, पंढरपूर, फलटण, श्रीरामपूर, मुंबई, तुळजापूर, कोल्हापूर, शिर्डी आदी लांब पल्ल्याच्या प्रवासी बस सेवा बंद केल्याची माहिती आगार व्यवस्थापक सागर गाडे यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी फक्त स्थानिक बस सेवा सुरू आहे.

■ **खासगी वाहनांकडून लूट**

**हडपसर :** काही आंदोलकांनी एसटी महामंडळाच्या बस फोडल्याच्या घटना घडल्याने मंगळवारी एसटी महामंडळाने सोलापूर रोडच्या दिशेने जाणाऱ्या एसटी बस बंद ठेवल्या. एसटी बंद असल्याने खासगी वाहनमालकांनी तिप्पट भाडे आकारले. जादा पैसे देता आले नाहीत, म्हणून वृद्धा लीलावती जाधव यांना घरी जावे लागले.

■ **फुरसुंगी-कोंढव्यात उपोषण**

**हडपसर :** फुरसुंगी गावातील भैरवा चौक येथे मराठा आरक्षणासाठी ग्रामस्थांनी अर्धनग्न होऊन आंदोलन केले. मुंढवा-केशवनगर येथील सुनील जामले व संतोष माने यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

■ **आंबेगावात बससेवा विस्कळित**

**मंचर :** मराठा आंदोलनाला आंबेगाव तालुक्यावासीयांनी पाठिंबा दिल्याने काही अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी खबरदारी घेऊन तालुक्यातील एसटी सेवा मंगळवारी सकाळी आठ वाजल्यापासून बंद केल्याचे मंचर एसटीचे वाहतूक नियंत्रक मारुती रिंदे यांनी सांगितले.

■ **बैलगाडा संघटनेचा पाठिंबा**

**राजगुरुनगर :** 'मराठा आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत खेड तालुक्यात यात्रा, उत्सव साजरे केले जाणार नाहीत; तसेच बैलगाडा शर्यतीही होणार नाहीत,' असा निर्णय खेड तालुका बैलगाडा संघटना, अखिल भारतीय बैलगाडा संघटना यांनी घेतला.

## एसटीच्या १५४ फेऱ्या रद्द

**जुन्नर :** 'नारायणगाव एसटी आगारातील एसटी सेवा मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर थांबवण्यात आली. या वेळी आगारातल्या एसटीच्या १५४ फेऱ्या रद्द करण्यात आल्या,' अशी माहिती आगारप्रमुख बालाजी सूर्यवंशी यांनी दिली. परिणामी, खेड, भोसरीहून वाहनचालकांनी प्रवाशांकडून जास्त भाडे उकळले.


**फाईल क्र. ११-२००११/२/२०२३-कॉम्प दिनांक ३१.१०.२०२३**
**ई-खरेदी सूचना**

सिपिंग महासंचालनालय, मुंबई हे सिपिंग महासंचालनालय (डीजीएस), भारत सरकार करिता ई-परीक्षा प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी सिस्टम इंटिग्रेटरच्या निवडीसाठी आरएफओआय आमंत्रित करत आहेत. या बोली दस्तऐवजात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार बोली प्रक्रिया आयोजित केली जाईल.

**या बोलीच्या आमंत्रणासंदर्भातील तारखा खाली दिल्या आहेत:**

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव | सिपिंग महासंचालनालय (डीजीएस), भारत सरकार करिता ई-परीक्षा प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी सिस्टम इंटिग्रेटरच्या निवडीसाठी स्वारस्याची अभिव्यक्ती करिता विनंती (आरएफओआय) |
| २. | निविदा आयडी | २०२३_डीजीएस_७७८८९९_१ |
| ३. | निविदा शुल्क/हरते | लागू नाही |
| ४. | सीपीपीपी पोर्टलवर आरएफओआय उपलब्धतेची तारीख | ०१-११-२०२३, ०९.०० वा. (बुधवार) |
| ५. | ईओआय सादर करण्याची प्रारंभाची तारीख | ०१-११-२०२३, १०.०० वा. (बुधवार) |
| ६. | प्रश्न सादर करण्याची शेवटची तारीख | १४-११-२०२३, १७.०० वा. (मंगळवार) |
| ७. | पूर्व-बोली स्पष्टीकरण अपलोड करण्याची तारीख | १४-११-२०२३, १७.०० वा. (शुक्रवार) |
| ८. | ईओआय सादर करण्याची शेवटची तारीख | ०७-१२-२०२३, १५.०० वा. (गुरुवार) |
| ९. | बोली उघडणे | ०८-१२-२०२३, १५.१० वा. (शुक्रवार) |
| १०. | बोली दस्तऐवजांची उपलब्धता | निविदा ई-निविदा वेबसाइट: www.eprocure.gov.in वर उपलब्ध आणि डाउनलोड करण्यायोग्य आहे. बोली दस्तऐवजातील सर्व त्यानंतरचे बदल असतील. |
| ११. | पत्रव्यवहाराचा पत्ता | सिपिंग महासंचालनालय, भारत सरकार, ९वा मजला, बीटा बिल्डिंग, आय-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई - ४०००४२ संपर्क व्यक्ती: १. डॉ. सुधीर कोहकाडे सिपिंग उपमहासंचालक (ई-गवर्नन्स) सूत्र पत्रविक्री कन्टीडिन ईमेल आयडी: sudhir.kohakade@gov.in सुशी. अरुणिका कर्मार व्यवस्थापक ईआय बोली प्रक्रिया व्यवस्थापन ईमेल आयडी: arunika.karmakar@in.ey.com |

बोलीदार वर नमूद केलेल्या तारखांनुसार ईमेलद्वारे पूर्व-बोली प्रश्न देखील सादर करू शकतात. उपरोक्त वेळ आणि तारखेच्या पलीकडे असलेल्या पूर्व-बोली प्रश्न कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. डीसीएल बोली दस्तऐवजातील कोणत्याही अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याचा किंवा मूळ पॅरामीटर किंवा सुधारणा न देता किंवा कोणतेही कारण न देता प्राप्त झालेल्या सर्व निविदा रद्द/नाकारण्याचा अधिकारं राखून ठेवत आहेत.

स्वाक्षरी/-
पीयूष मधु
कार्यकारी अधिकारी प्राथमिक कस्टोडियन
सिपिंग महासंचालनालय
ईमेल आयडी: muthu.pl@gov.in


# नवले पुलाजवळ जाळपोळीमुळे वाहतूक कोंडी

आशिष काळे

(पान १ वरून)

■ **वाहतूक ठप्प**

आंदोलनामुळे मुंबईकडे जाणारी आणि बेंगळूरूकडे जाणारी वाहतूक दुपारी तीनपर्यंत पूर्ण ठप्प झाली होती. कात्रज, आंबेगाव, नऱ्हे, सिंहगड रस्ता परिसर, वारजे, चांदणी चौक परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. या वेळी अनेक स्कूल बस आणि रुग्णवाहिका कोंडीत अडकल्या होत्या. वारजे आणि वाकड परिसरातही आंदोलन करण्यात आल्याने महामार्ग ठप्प झाला होता.

■ **पोलिसांचा बंदोबस्त**

नवले पुलाजवळील आंदोलनावेळी सिंहगड रस्ता पोलिस आणि भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यातील पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी आंदोलकांची समजूत काढल्यानंतर रस्ता खुला करण्यात आला. अनुचित घटना टाळण्यासाठी पोलिस उपायुक्त सोहेल शर्मा, सिंहगड रस्ता पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभय महाजन; तसेच अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी हजर होते.

मराठा आरक्षणप्रश्नी आंदोलनात बस जाळल्यामुळे मंगळवारी नवले पुलाजवळ वाहतूक कोंडी झाली. रुग्णवाहिका, स्कूल बसही यात अडकल्या.

# मराठा आरक्षणप्रश्नी पिंपरीत उपोषण

**बंद पाळण्यासह सरकारचे घातले श्राद्ध**

**म. टा. प्रतिनिधी,** पिंपरी

पिंपरी-चिंचवड शहरात मराठा आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. मराठा आरक्षणासाठी पिंपरीतील आंबेडकर चौकासह ठिकठिकाणी मराठा कार्यकर्ते उपोषणाला बसले आहेत. चऱ्होली, भोसरी, रावेत या ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात आला. वल्लभनगर आगारातूनही अनेक एसटी फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे सरकारचा निषेध म्हणून दशक्रिया विधी करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी सुरू असलेले आंदोलन चिघळले आहे. गावोगावी राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आली आहे. एसटी महामंडळाच्या अनेक फेऱ्या रद्द केल्या आहेत. 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिल्याचे मेसेज फिरत असल्याने मंगळवारी चऱ्होली, रावेत, भोसरी या ठिकाणची सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. सकल मराठा समाजाकडून भोरगा गोसावी मंदिर येथे सरकारचा दशक्रिया विधी करून निषेधही करण्यात आला आहे.

> "मराठवाडा, पंढरपूर, सोलापूर या भागांतील सर्वच फेऱ्या बंद होत्या. मराठा आरक्षण आंदोलन आणि पोलिसांच्या सूचनेनुसार या फेऱ्या बंद ठेवल्या आहेत. कोकणातील गाड्यांना प्रवासी नसल्याने त्या फेऱ्या बंद ठेवण्यात आल्या आहेत.
>
> – संजय वाळवे, आगारप्रमुख, वल्लभनगर


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की हिकडे पुणे पेठ हुकुमी तालुका मावळ जि पुणे मधील हद्दीतील गाव मौजे गहुंजे येथील सर्व्हे नं २०५(पार्ट), २२६ (पार्ट), २२६(पार्ट), २२६ (पार्ट), २२७(पार्ट), २२८(पार्ट), २२९ ते २३१, २३३ ते २४१, २४२(पार्ट), २६३ ते २८७, २८८(पार्ट), २८९(पार्ट), २८९(पार्ट), २८९ ते २८६, ४८(पार्ट), ३८९(पार्ट), ३९० हया मिळकतीवर बापलेश्वर लोहा बेलगोंडा हया ऊसाच्याशीत एस्टेटिंग को ऑप हौसिंग सोसायटी लि म्हणून टॉवर नं १७ मध्यात सोडावयास व्यवस्थापकीय एस्टेटिंग नं १६० व पार्की क्षेत्र ३६१.८८ चौ.मी किंवा व दोन कमरेचा फ्लॅट एकूण-१४८.८१ स्क्वे.- १६१ जागी हि मिळकत विक्रमा करता श्री अविनाश कोहरा, श्री अनिरुद्ध कोहरा व इतु कोहरा यांच्या मालकीची असून त्याच्या तावे वहिवाटीत आहे. सदर मिळकतीचेची विक्रमास मालक व जोत्स्ना आहिता मनमे खरोची भोलगी चाकु आहे. सदरची मिळकत ही निर्वाद व निजीखाली बोजाहित असल्याचा बाबत विचारात मालकांनी आपले अहितिकार दिलेत आहे. तसेच, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार हितसंबंध असल्याचा सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे आत सदर मुळकाणपासूनची आपल्या खालील पत्त्यावर पुर्ण कागदि व त्याचा कोणत्याही व्यवहारही एकत्र हितसंबंध आहे त्यांनी ही जाहिरपत्रिक सोडसिला आहे असे समजण्यात येईल. नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ॲड.आनंद कुमार अण्णाचार
ॲड.राहुल रामराव भोसले
कायदे हाउसिंग लॉ ४९, बिल्डींग ४ बी,
विश्वकर्म, पुणे ३३.मो. ९१६८७७०१३ / ९१७८१९५५५



**पुणे महानगरपालिका**
**निविदा प्रक्रिया कक्ष मुदतवाढ निविदा जाहिरात**

कामकाजाचे ठिकाण :-निविदा प्रक्रिया कक्ष, उपआयुक्त परिमंडळ क्र.५ शिवाजी ढेरे उदयोग भवन, दुसरा मजला टिळकरोड, पुणे महानगरपालिका.

विक्री कालावधी दिनांक : ०१/११/२०२३ ते ०७/११/२०२३ दु : २:०० पर्यंत
स्विकृती कालावधी दिनांक : ०१/११/२०२३ ते ०७/११/२०२३ दु : २:०० पर्यंत
निविदा उघडणे कालावधी दिनांक : ०९/११/२०२३ दु : १२:०० वाजता

| अ.क्र. | खात्याचे नाव | मुदतवाढ निविदा क्रमांक |
|---|---|---|
| १) | बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय | PMC/DMC-5/BIBWEWADI/2023/129, |

अ) वरील टेंडरची विक्री व स्विकृती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन फक्त ऑनलाईन चालू आहे.
ब) बाकी सर्व मजकुर पुर्वी प्रसिध्द केल्याप्रमाणे कायम राहील.
क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/ आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

जाहिरात क्र : ४०-DC-५-२०२३
दिनांक : ३१/१०/२०२३
स्वाक्षरी-
उप आयुक्त
परिमंडळ विभाग क्र.५
पुणे महानगरपालिका, पुणे



**पुणे महानगरपालिका**
**खास देणगीविषयक जाहिर प्रकटन**

पुणे महानगरपालिका हद्दीमधील विविध कार्य करणाऱ्या विविध सार्वजनिक संस्थांना सन २०२४-२५ चे अर्थसंकल्पामध्ये खास देणगी देणेसाठी रकमेची तरतूद करावयाची आहे. सदर देणगी रकमेचा विनियोग संस्थेच्या मांडवली व विशिष्ट स्वरूपाच्या कार्याचे खर्चासाठी असावयास पाहिजे.

ज्या संस्थेस खास देणगी हवी असेल त्या संस्थेने पुणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in, www.punecorporation.org या संकेत स्थळावर दि. ०१ नोव्हेंबर २०२३ ते ३० नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर करावे. अर्जासोबत मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती (pdf file) अपलोड करणे आवश्यक आहे.

ज्या संस्थेचे कार्य,न्युनिसिपल कॉर्पोरेशन ठराव क्र.३८४,दि.२२/०२/१९५१ व दुरुस्त ठराव क्र. ५. दि. १७/०४/१९६९ मध्ये नमूद केलेल्या विविध कार्यांशी अंतर्गत होतु शकेल, अशा संस्थांचा खास देणगी देणेबाबत विचार होईल तथापि देणगी विषयक अर्जसंकल्प रकमेची तरतूद न झाल्यास त्याबाबत कोणतेही कारणनिर्मासा करणेची जबाबदारी पुणे महानगरपालिकेची राहणार नाही.

सही-
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका
जाहिरात क्र. ९/११५७, दि. ३१.१०.२०२३ 27/10/2023



**PUBLIC NOTICE**

All the people are hereby informed by this Public Notice that **(1) MR. SAMIR ASHOK INAMDAR and (2) MRS. VAISHALI SAMIR INAMDAR,** Both Residing at : A-15/4, Kubera Park, Kondhwa Road, Near Fakhri Hills, Kondhwa Khurd, Pune – 411048, who are the owners of the Flat, which is more particularly described in the "Schedule of the Property" written hereunder, have agreed to sell the said Flat, to my client and they have assured my client that the said Flat is free from all encumbrances of whatsoever nature and that they have a clean, clear and marketable title in the said Flat.

If any person has any right, title or interest in the said Flat by way of Lease, Gift, Charge, Lien, Sale, Exchange, Loan, Mortgage or in any other way, he/she should inform me **within 15 days,** in writing from the date of publishing this Public Notice, along with the related original documents, showing his/her right, title or interest in the said Flat.

Otherwise my client shall complete the transaction, presuming that the said Flat is free from all encumbrances and no body has any right, title or interest in the said Flat and all such prior claims, if any, have been waived by the respective persons, and my client shall not be responsible in any way, if any objection is raised afterwards.

**SCHEDULE OF THE SAID PROPERTY**

All that piece and parcel of **Flat No. 4,** situated on the **First Floor,** in **Building No. A-15,** in **"Kubera Park Co-operative Housing Society Limited",** situated at Survey No. 601 Hissa Nos. 3, 5, 6, 7/2 & 8, City Survey No. 3525, **Bibwewadi**, Pune, situated within Registration Sub District Taluka Haveli, District Pune and also within the limits of Pune Municipal Corporation, along with undivided share in the common areas, amenities and facilities apportenant thereto.

Pune, Date : 31/10/2023.

**H. L. HEMRAJANI (Advocate)**
Office : Kalpataru Plaza, B-212, 2nd Floor,
224, Bhawani Peth, Pune - 411 042. (Ph. No. 26387101)



**पुणे महानगरपालिका**
**निविदा प्रक्रिया कक्ष, फेर निविदा जाहिरात - नविन कामे**

**विक्री कालावधी दिनांक :** ०१/११/२०२३ ते ०८/११/२०२३ सेळ - दुपारी १२.०० पर्यंत
**स्विकृती दिनांक :** ०१/११/२०२३ ते ०८/११/२०२३ दुपारी १२.३० पर्यंत
**तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :** ०९/११/२०२३ दु: १२:३०

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पुर्वगणित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/GARDEN/ 2023/071 | उद्यान विभाग | पु. ल. देशपांडे उद्यान येथील मास्टर प्लॅन कलाग्राम व उर्वरित विविध विकासाची कामे करणे अंतर्गत पु. ल. देशपांडे येथे हॉर्टीकल्चर विषयक सुधारणा कामे करणे. | 1359.00 | 2000000.00 | 20000.00 | 10 महिने | श्रीम. हरपळे ९६८९९३००२४ |

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुमवीण.न.पा. नान्यता प्राद्यशासन नान्यता प्राप्त टेकेदारांकडून (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करुन घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पध्दतीने मागविण्यात येत आहेत.
क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम **ऑनलाईन** सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे.

सही-
**(अशोक घोरपडे)**
**मुख्य उद्यान अधिक्षक**
**पुणे महानगरपालिका**
जाहिरात क्र. ९/११५४, दि. ३१/१०/२०२३



पुण्यातील प्राइम प्रॉपर्टीसाठी, घरासाठी पाहा
TIMES inter act

**Public Notice**

General Public is informed that **Shop No. 5, Yashodanandan Co-op. Housing Society Ltd.,** Plot No. 27, S. No. 199, 204, /205, 106/1, 109/1, CTS No. 142, Vimannagar, Lohegaon, Pune 411014 is on the joint names of **Mr. Vashu Tikamdas Jaisinghani & Mrs. Hema Vashu Jaisinghani. Mrs. Hema V. Jaisinghani** has informed the Society that her husband Mr. Vashu T. Jaisinghani has passed away on 07/04/2023 at Mumbai, without making nomination or testamentary document & leaving behind Wife Mrs. Hema V. Jaisinghani, 2 married daughters, i.e. Mrs. Karishma Arid Punjabi & Mrs. Sapna Dinesh Chawla as the only legal heirs. She has applied the Yashodanandan Society for deleting the name of late Mr. Vashu T. Jaisinghani & record the names of all his legal heirs in Society records & on share certificate etc. Necessary application, death certificate, etc. are submitted to the society. If anyone is having any objection to delete the name of Late Mr. Vashu T. Jaisinghani &/or to record the names of his abovementioned 3 legal heirs, in Society records, they may notify the same in writing within 15 days from the publication hereof, failing which the society will take the appropriate decision as per the Bye-laws of the Yashodanandan Society & no complaints will be heard thereafter. Hence this notice.
Pune, Date - 31/10/2023

**Adv. Anand M. Chanodia**
Office No. G-110, Ground Floor, Ashoka Plaza, Between Hyatt & Ibis Hotel, Nagar Road, Viman Nagar, Pune - 411014.
Mob- **9096324252**


## गळीत हंगाम कार्यक्रम रद्द

**जुन्नर :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा उद्या, गुरुवारी (दोन नोव्हेंबर) होणारा गळीत हंगाम शुभारंभाचा कार्यक्रम मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर रद्द केला आहे. मात्र, हा कार्यक्रम मराठा आंदोलक आणि शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आज, बुधवारी (एक नोव्हेंबर) सकाळी १० वाजता होणार असल्याची माहिती विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी दिली. या कार्यक्रमाला शरद पवारांसह दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. विश्वजित कदम, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके उपस्थित राहणार होते.

**आत्मदहनाचा होता इशारा**

विघ्नहर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या कार्यक्रमाला शरद पवार येणार असतील, तर त्यांच्या गाडीपुढे आत्मदहन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते संभजी तांबे यांनी दिला होता.

## औंध संगीत महोत्सव उद्यापासून रंगणार

**सातारा :** औंध (ता. खटाव) येथे आयोजित औंध संगीत महोत्सव उद्या, गुरुवारपासून रंगणार आहे. हा महोत्सव शुक्रवारच्या पहाटपर्यंत चालणार असून, या महोत्सवाचे यंदाचे ८३वे वर्ष आहे.

यंदाचा महोत्सव तीन सत्रांमध्ये सादर होईल. सकाळी नऊ वाजता महोत्सवाचे उद्घाटन माजी आमदार प्रभाकर घार्गे, खटाव-